CONGRESS







## आरटीआयचा प्रभाव

- आरटीआयमुळे नागरिकांना प्रथमच इतकी सगळी माहिती प्राप्त करणे शक्य झाले
- नागरिक आता हताश नाहीत, तर अधिक सक्षम बनले आहेत आणि आपल्या सरकारमध्ये त्यांची मागणी वाढली आहे.
- पारदर्शी सरकार आणि लोकपाल चळवळीसाठी हे आंदोलन स्पष्टपणे आरटीआयच्या परिणामी अस्तित्वात आलं आहे.



Marathi





## आपल्याला माहिती आहे का?

- आपण आता सर्व घटनात्मक प्राधिकरणांसह कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाला प्रश्न विचारू शकता.
- संसद सदस्य प्राप्त करू शकतात अशी कोणतीही माहिती, आता आपण देखील प्राप्त करू शकता.
- आपले सरकार आता आपल्या नागरिकांप्रती अधिक उत्तरदायी आहे.

### हे सर्व आता आपल्या अधिकारात आहे

आपल्याला काहीही लपविण्यासारखं नाही, नागरिकाच्या सर्वोच्च स्थानावर ठाम विश्वास असलेलाच पक्ष केवळ असा कायदा करू शकते, आणि काँग्रेस-प्रणित युपीए सरकारने नेमके हेच केले आहे.

माहितीचा अधिकार कायदा, 2005, आपल्यासाठी आणला काँग्रेस पक्षाद्वारे

CONGRESS



## RTI अर्ज सादर करण्याची प्रक्रिया:

- कोणीही व्यक्ति माहितीसाठी लेखी स्वरूपात पीआयओकडे (PIO) विनंती सादर करू शकतो. पीआयओने सदर कायद्याखाली माहिती विनंती केलेल्या व्यक्तिला माहिती पुरविणे बंधनकारक आहे.

- सदर विनंती अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी निगडीत असेल (संपूर्ण किंवा अंशतः), तर 5 कामकाजी दिवसांच्या आत सदर विनंतीचा संबंधिक भाग दुसऱ्या पीआयओला हस्तांतरित/पुढे पाठवण्याची जबाबदारी पहिल्या पीआयओची राहील.

- याशिवाय, आरटीआय विनंती आणि अपिले स्विकारून आपल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या पीआयओकडे पाठविण्यासाठी प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने सहाय्यक सार्वजनिक माहिती अधिकारी (APIO) नियुक्त करणे आवश्यक आहे.

- अर्जदाराने माहिती प्राप्त करण्यासाठी आपले नाव आणि संपर्क तपशीलापेक्षा अन्य कोणतीही माहिती प्रकट करण्याची आवश्यकता नाही.

